स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेंतर्गत मराठी विषयाच्या पीएच.डी पदवीसाठी

सादर करण्यात येणारा शोध प्रबंध आराखडा

:: **संशोधन शीर्षक** ::

"डॉ. केशवराव धोंडगे यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास"

:: **संशोधक** ::

गजानन उत्तमराव मोरे

(एम ए बी एड मराठी, समाजशास्त्र)

:: **मार्गदर्शक** ::

डॉ. साहेबराव शिंदे

वसंतराव नाईक महाविद्यालय सिडको, नांदेड

“केशवराव धोंडगे यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास”

प्रस्तावना :-

मराठी साहित्य विश्व हे अतिशय समृद्ध आहे.त्यात कथा कादंबरी कविता लेख अशा पद्धतीचे लेखन मोठ्या प्रमाणात झालेले आहे केशवराव यांनी आपल्या विद्रोही लेखनातून , चरित्रात्मक लेखनातून समाजात असलेल्या मनुवादी विचाराला परखडतेने विरोध केला आहे. समाजातील गोरगरीब जनता ही निपचत पडलेली आहे त्यांना मानसन्मान मिळत नाही हे त्यांनी बालपणापासूनच पाहिले होते शिक्षण घेत असताना त्यांना आलेल्या अडीअडचणी,विद्यार्थीझालेली शिक्षणाची झालेली तारांबळहैद्राबाद मुक्ती संग्रामात सोसावे लागलेले घाव.जीवन जगण्यासाठी माणसाचीचाललेली धडपड त्यांनी पाहिलेली होती.अवतीभवतीचा समाज असुरक्षिततेने ग्रासलेल्या अवस्थेत असताना एक आशेचा सूर असलेले केशवराव धोंडगे त्यांची विचार आणि साहित्य हे जगण्याला उर्मी देणारे ठरतात.मानवतावादी,मार्क्सवादी, समाजवादी अशा विचारांनी आपले नाव साहित्य लेखनात केशवरावाने निर्माण केले आहे.केशवरावांची भाषा सर्वसामान्य व्यक्तीला कळेल अशी साधी सरळ भभाषशैली आहे.वेळप्रसंगी ती परखडही आहे. केशवरावनी आपल्या साहित्यामध्ये द्दीन दलित पीडित वंचित उपेक्षित नाहीरेवाले यांचे जीवन शब्दांकित केले आहे अन्याय अत्याचार शोषण जातीयता विषमता याविरुद्ध त्यांनी संताप व चीड व्यक्त करत विषम समाज व्यवस्थेवर कठोर हल्लेचढवले. चांदबिबी सुलताना उपेक्षित असलेल्या मुस्लिम समाजातील महिलेचा व तिच्या कार्याचा गुणगौरव त्यांनी आपल्या लेखणीतून केलेला आहे .

संशोधनाचा हेतू :-

संशोधन कार्य करत असताना जो हेतू समोर ठेवून केशवराव धोंडगे यांच्या समग्र साहित्याच्या समाजदर्शनाचा प्रस्तुत ठिकाणी जो शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे तो इतर संशोधनापेक्षा निश्चितच वेगळा आहे ते वेगळेपण पुढील प्रमाणे थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे गोरगरीब वंचित यांना दिली जाणारी अपमानास्पद वागणूक त्यांच्या जीवन जगण्यातल्या समस्या समाज वास्तवाची अगणित उदाहरणे त्यांच्या साहित्यातून समोर आली आहेत याचा प्रकर्षाने शोध घेणे हा संशोधनाचा हेतू आहे तसेच प्रस्तुत शोध प्रबंधाच्या अभ्यासातून

केशवराव धोंडगे यांच्या मराठी सारस्वतातील भाषाशैली लेखनशैली शब्दांकित करण्याचा प्रयत्न करणे हाही संशोधनाचा हेतू आहे कामगार वर्गातील कष्टकरी वर्गातील दैनंदिन दुःख व यातनामय असते परंतु उज्वल उद्यासाठी उद्याच्या सोनेरी पहाटेसाठी आपण जगलं पाहिजे लेकरांना शिक्षण दिले पाहिजे ही मनी आज धरून जगणारी माणसे त्यांच्या साहित्यात दिसून येतात धोंडगे यांचे साहित्य बरोबरच समाजासाठी असलेले योगदान ते पत्रकारितेतून राजकारणातून दिसून येते. या सर्व प्रकारातून समोर येणाऱ्या मानवी समाजाचे दर्शन संशोधनातून अभ्यासणे योग्य वाटते

संशोधन विषयाचे महत्त्व :-

१९६० नंतर समाजामध्ये अनेक सामाजिक राजकीय स्थित्यंतरे घडून आली ती १९६० नंतर ही समाज दुःखाने ग्रासून गेला होता. वंचित उपेक्षितांचे दुःख आपल्या साहित्यात मांडले ते केशवराव धोंडगे यांनी आपल्या सामाजिक दृष्टिकोनातून समाजाची होत चाललेली कुचंबाना ही साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न केला.

समाजातील गरीब वर्ग, कामगार वर्ग, नाहीरे वालावर्ग यांची दयनीय अवस्था होती त्यांच्या वास्तव जगण्याबद्दल केशवरावांनी आपल्या साहित्यात मार्मिक वर्णन केले आहे. ही माणसं जगतात कशी ही या साहित्यातून वाचून मनसुन्न करणार आहे स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुःख अकारण तिला भोगावे लागतात दुसऱ्यांनी लाजलेली दुःख तिला पदोपदी सहन करावी लागतात तिच्या मनाची कुचुंबना होते तिला जगण्याचा मानसन्मान समाजामध्ये मिळत नाही अशा नानाविध समस्या या त्यांच्या निदर्शनास आल्या आणि त्यांनी त्या आपल्या साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न केला असा समाज समाजातील निपसंत पडलेल्या व्यक्ती यांच्या सामाजिक तिचे दर्शन विविध अंगाने व्हावे असे वाटते.

या प्रबंधाच्या अभ्यासातून केशवराव धोंडगे यांनी मराठी साहित्यातील वेगळ्या अंगाने मांडलेल्या साहित्यकृती ह्या युगपरिवर्तनाचा संदेश देणाऱ्या आहेत. समाजाने ज्यांना नाकारले त्यांना समाज कसा स्वीकारेल याकरिता आपल्या

लेखणीच्या माध्यमातून नाही रे वाल्यांना न्याय देण्याचं काम लेखणीतून करण्याचा प्रयत्न केला आहे

संशोधनाची उद्दिष्टे :-

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

1) केशवराव धोंडगे यांच्या साहित्यातून आलेल्या समाज जीवनाचा शोध घेणे.
2) केशवराव धोंडगे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेऊन त्यांच्या प्रेरणांचा मागवा घेणे.
3) साहित्याचा सामाजिक अंगाने अभ्यास करणे.
4) कामगार नाही रे वालावर्ग यांचे साहित्यातील स्थान व वेगळेपण तपासणे
5) साहित्य लेखन तंत्रनिष्ठ नसून अनुभवानिष्ठ आहे याचा प्रत्येक घेणे व केशवराव धोंडगे यांच्या समग्र वाङ्मयाचा गांभीर्याने विचार करणे.

सदरील विषयानुषंगाने संशोधन कार्य करण्यासाठी संशोधनाची साधने म्हणून संदर्भ ग्रंथ वांग्मय कोष विशेषांक नियतकालिके इत्यादीचा वापर करण्यात येणार आहे

संशोधन कार्यात केशवराव धोंडगे यांच्या समग्र साहित्याचा संदर्भ ग्रंथ म्हणून वापर करण्यात येणार आहे

संशोधन कार्यात केशवराव धोंडगे यांच्या वैचारिक लेखनाचा व इतर साहित्याचा संदर्भ ग्रंथ म्हणून वापर करण्यात येणार आहे तसेच संशोधनासाठी उपयोगी पडणाऱ्या अनेक लेखकांच्या ग्रंथांचा पुस्तकांचा संदर्भ ग्रंथ म्हणून वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाची गृहीतके :-

1) केशवराव धोंडगे यांच्या साहित्यातून सामाजिक जाणीव़ा व्यक्त होतात आणि समाजातील वेदना स्पष्ट होतात.
2) केशवराव धोंडगे यांच्या साहित्यातून कामगार उपेक्षित नाही रे वाल्याची जीवन सादर होते.

3) केशवराव धोंडगे यांच्या साहित्यात समाजातील विषमता दिसून येते
4) अन्याय हक्क समतेसाठी सामाजिक जाणीव व्यक्त होते.
5) केशवराव धोंडगे च्या साहित्यातून रूढी परंपरा झुंगारल्याचे दिसते.
6) समाजातील अन्याय अत्याचार स्पष्ट होतो.

संशोधन कार्यपद्धती:-

केशवराव धोंडगे यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास या संशोधनात समग्र साहित्य वृत्तीचे असे विश्लेषण करणार आहे तसेच त्यातून व्यक्त होणाऱ्या समाजाची जीवन व्यक्त करण्यासाठी विश्लेषणात्मक वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करून माहितीचा प्राथमिक स्त्रोत म्हणून केशवराव धोंडगे यांच्या समग्र साहित्य बरोबरच माहितीचा दुय्यमस्त्रोत म्हणून विविध संदर्भ ग्रंथ वांग्मय कोश विशेषांक नियतकालिके यांचा वापर केला जाईल तसेच धोंडगे यांच्या साहित्याची स्थान व वेगळेपण निश्चित करण्यासाठी तुलनात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे.

प्रकरण योजना

प्रकरण पहिले:- **केशवराव धोंडगे यांचे जीवन व** कर्तृत्व . .

या प्रकरणात केशवराव धोंडगे यांचे जीवन पाहताना बालपण, शिक्षण, नोकरी, विवाह, चळवळ, लेखन, राजकारण, समाजकारण या टप्प्यातून अभ्यासावयाचे आहेत. सामान्य कुटुंबात जन्मलेले वाढलेले केशवराव त्यांचा जीवन प्रवास त्यांची गोरगरीब जनतेसाठी ची तळमळ त्यासाठी केलेल्या चळवळी या सर्वांचा आढावा या प्रकरणात अभ्यासावयाचा आहे.

प्रकरण दुसरे :- **केशवराव धोंडगे यांची समग्र साहित्य संपदा**

01. उपेक्षित शहिदे आजम युगपुरुष छत्रपती संभाजी महाराज 02. शिव कोहिनूर जीवा महाले 03. क्रांती देवता रणरागिणी महाराणी अहिल्यादेवी होळकर 04. मुक्तेश्वरी 05. निष्काम कर्मयोगी स्वातंत्र्य सेनानी योगीराज निवृत्ती महाराज 06. संत महात्मा चोखोबाजी आपण का नाही केले धर्मांतर? 07. गीतारहशाचे रहस्य गीतेतील अद्भुत मृगजळी तत्त्वज्ञान 08. युगपुरुष महात्मा श्री गुरुगोविंद सिंगजी महाराज 09. मुक्ताई स्वतःचे समता

दर्शक विद्रोही रसपान 10. तूपकुंडी गौरव, माळकुंडी उत्सव धृतराष्ट्राचे हृदयरोपण 11. माय माय स्तवन माय स्मरण 12. बहाद्दरपुरा नानकशाही मठाचे मारेकरी 13. शकून अपशकुन 14. निसर्गवादी त्यागराज जगद्‌गुरु श्री संत सेवालाल महाराज 15. हैदराबाद मुक्ती लढ्यातील मन्याडखुरी विजयी कारगिल शौर्यगाथा 16. रूमनपेची विठूअवतार 17. प्रकृती देवी आवली (जिजाऊ) माय महापुरुष जगद्‌गुरु तुकोबाराय 18. सुग्या मुग्याचा उपनिषद 19. शूर मन्याडखोरी कंधारची युगपुरुष महात्मा पुल्लिंग बेदी 20. शंभूकाचा कुणी राम व त्याची वानरशाही 21. निसांतर्गत जेलमधील मुक्त विचार मंथन 22. समता दिंडी का कशासाठी कुणासाठी 23. गुराखी बोधामृत गुराखी राजाची गुराखी गीत 24. चाँद बीबी चाँद सुलताना 25. सज्जनगडास आसनगावच्या समर्थ दाशीचा दासबोध 26. स्वातंत्र्य भास्कर त्याग शिरोमणी युगपुरुष महाराणा प्रताप सिंह 27. नामांतराच्या चक्रीवादळात महाराष्ट्र विधानसभेतील मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रस्तावावरील आमदार धोंडगे यांची ऐतिहासिक भाषण आणि 28. सणात सण माय मानव मुक्ती सण.

प्रकरण तिसरे:- केशवराव धोंडगे यांच्या साहित्यातील समाजदर्शन

केशवराव धोंडगे यांचे लेखन विविध सामाजिक अंगानी अविस्कर झाले दुःखी कष्टी उपेक्षित वंचित समाजाचे वास्तव पूर्ण चित्रण त्यांच्या साहित्यात दिसून येते. केशवराव धोंडगे यांची सामाजिकता त्यांच्या लेखनात तीव्रतेने व्यक्त झाली आहे अन्याय अत्याचार शोषणग्रस्त समाजाला युग परिवर्तनाकडे घेऊन जाण्यासाठी मुक्तीचा क्रांतीचा लढा त्यांनी साहित्यातून मांडलेला दिसून येतो. सामाजिक बांधिलकी धोंडगे यांच्या साहित्यात प्रत्ययास येते. कामगार वर्ग श्रमिक वर्ग यांच्या जगण्याची जगण्याची तळमळ साहित्यात दिसून येते.

प्रकरण चौथे :- उपेक्षित **महापुरुषांचे चरित्रात्मक** स्वरूप

या प्रकरणात युगपुरुष महात्मा श्री गुरुगोविंद सिंगजी महाराज, चांदबिबी चांद सुलताना, प्रकृती देवी आवली (जिजाऊ) माय, महापुरुष जगद्‌गुरु तुकोबाराय , उपेक्षित शहिदे आजम युगपुरुष छत्रपती संभाजी महाराज या विविध उपेक्षित

महापुरुषांच्या चरित्राबद्दल आपल्या लेखणीतून मांडलेले विचार या प्रकरणात आहेत.

प्रकरण पाचवे :- **केशवराव धोंडगे यांच्या साहित्याचे वांङमयीन मूल्यमापन**

प्रस्तुत प्रकरणात केशवराव धोंडगे यांच्या साहित्यावर अनेक साहित्यिकांनी केलेले विवेचन आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येईल किशोरावांचे साहित्य हे दिन दलित उपेक्षित वंचित नाही रे वाले यांच्यासाठी आहेच तसेच दक्षिण काशी मानली जाणाऱ्या नांदेड नगरीतील शिखाचे दहावे गुरु युगपुरुष महात्मा श्री गोविंद सिंगजी महाराज यांचे चरित्रात्मक लेखन केले आहे.

प्रकरण साहावे:- **उपसंहार व निष्कर्ष**

प्रस्तुत प्रकरणात संशोधनात घेतलेल्या सर्व प्रकरणांचा आढावा घेण्यात येणार आहे म्हणजेच पहिल्या प्रकरणातील केशवराव धोंडगे यांचे जीवन कर्तृत्व तसेच त्यांच्या कार्याचा चढता आलेख त्यावर केलेली चर्चा त्यांच्या समग्र साहित्य संपदेवर केलेले वांग्मयीन मूल्यमापन त्यांच्या साहित्यातील समाज दर्शन त्यांची भाषाशैली लेखन शैली भाषेतील परखडपणा
केशवराव धोंडगे यांच्या साहित्यात आलेल्या समाजाचे वास्तव चित्रण यांचा संक्षेप अभ्यासणे

अशा प्रकारे सर्व प्रकरणाचा आढावा उपसारामध्ये घ्यावयाचा आहे त्यानंतर अभ्यासांती काही प्रमुख निष्कर्ष स्पष्ट करण्यात येतील

संदर्भसूची :-

1) डॉ. साहेबराव कंधारे "मुक्ताई "सचिव श्री शिवाजी मो. ए. सो. कंधार (1991)
2) डॉ कंधारे साहेबराव संपा " केशवायान" केशवराव धोंडगे यांची अग्रलेख बोली प्रकाशन, परभणी प्र आ (1993)
3) माधव गडकरी "संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील महारथी" मनोविकास प्रकाशन मुंबई 1987 .
4) धोंडगे केशव शंकर" मुक्तेश्वर गीता" प्रकाशात मा. वी. शेंडगे (1993)
5) गुराखी मुक्तीपाठ (मायपाठ) प्रकाशन (1993)

6) “निष्काम कर्मयोगी योगीराज स्वातंत्र्य सेनानी सद्‌गुरु निवृत्ती महाराज” प्रकाशक नारायण पाटील तेलंग प्रथम आवृत्ती (1996)
7) “हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम” श्री वसंत पोतदार, आष्टा, (1984)
8) सौ लुंगारे सी .डी “ गंधाली”

वृत्तपत्रे :-

1) जय क्रांति (साप्ताहिक कंधार)
2) दैनिक मुंबई (मुंबई)
3) दैनिक सामना (मुंबई)
4) महाराष्ट्र टाइम्स (मुंबई)
5) दैनिक मुंबई मराठा
6) प्रजावाणी (नांदेड)

संशोधक
गजानन उत्तमराव मोरे
(एम.ए.बीएड मराठी)
(नांदेड)
gajumore2005@gmail.com
मो. 9665312005

मार्गदर्शक
प्रा.डॉ. साहेबराव शिंदे
(वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी)